# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागा मार्फत "03 डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन निमित्त सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर दिव्यांग दिन निमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागामार्फत आजमिती पर्यंत 2699 दिव्यांगाची नोंद विभागाकडे असुन दिव्यांगा करीता गतवर्षात म्हणजेच सन 2022-23 या वर्षात 1 कोटी 75 लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली होती परंतु मुळ तरतुदी पेक्षा जास्त् खर्च करुन दिव्यांगाना प्राधान्य दिलेले आहे. तसेच सन 2023-24 तरतुद 1 कोटी 75 लाख तरतुद करण्यात आलेली असुन आजमितीपर्यंत 39 दिव्यांग मुलेमुली यांना शाळेकरीता शैक्षणिक फी, 1065 दिव्यांग लाभार्थ्यांना पेंशन योजेनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागामार्फत परिवहन सेवेच्या बसमधून प्रवास करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना बस तिकिटामध्ये 100% सवलत देण्यात येत आहे. या सवलतीचा या वर्षी एप्रिल-2023 ते ऑक्टोबर 2023 या कालावधीमध्ये 101508 दिव्यांग प्रवाशांनी लाभ घेतला असुन दिलेल्या सवलतीची रक्कम रु. 10,47,535/- इतकी आहे..